# नियमित दिवाणी मुकदमा क्र.३५६/२०१४ मधील नि. १४१ वर आदेश

प्रस्तुत अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता,१९०८ चे आदेश ६ नियम १७ अन्वये मूळ दाव्यामध्ये दुरूस्ती करणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे. वादी यांनी अर्जासोबत वादीचे शपथपत्र नि.१४२ वर दाखल केले आहे.

०२. वादी असे कथन करतो की, हस्त दोषाने दावा मिळकतीचे वर्णनात दावा मिळकत 'अ' तसेच, दावा मिळकत 'क' मध्ये काही गट नंबरमध्ये तसेच, क्षेत्रामध्ये चुक झालेली आहे. ती दुरुस्त दाव्याचे अंतिम न्यायनिर्णयात अपूर्णतः राहील. वादी असे कथन करतो की, दावा कलम १अ मध्ये अ. नं. ८ मध्ये गट नंबर ५६७ लिहीलेला आहे, मात्र अ. नं. १७ मध्ये तोच गट नंबर लिहीला गेला आहे. त्याऐवजी खालीलप्रमाणे दुरुस्ती करणेस परवानगी मिळावी.

१. दावा मिळकत ३ अ. नं. १७ मध्ये – अ. नं. १७, गट नंबर ५६७, क्षेत्र ००–५९, आकार ३–९४ आर यावर काट मारणेत येवून त्या ठिकाणी अ. नं. १७ – ५५२ – ००–५२ – ००–१६, तसेच दावा कलम अ मधील अ. नं. १५ मध्ये चुकीचा गट नंबर ३८४ असा लिहीला गेला आहे. त्यावर काट मारणेत येवून त्या ठिकाणी '६८४' असे लिहीणेत यावे. दावा कलम ३ मध्ये बनपुरी, तालुका – खटाव मधील (१) मध्ये गट नंबर २८ असे लिहीले गेले आहे, त्यावर काट मारणेत येवून त्या ठिकाणी गट नंबर ३८ असे लिहीणेस परवानगी मिळावी. सदरची दुरुस्ती ही साध्या स्वरुपाची असून, दाव्याच्या स्वरुपावर कोणताही परीणाम होत नाही. करीता, वरीलप्रमाणे दुरुस्ती करणेस परवानगी मिळावी, अशी वादी विनंती करतो.

०३. प्रतिवादी क्रमांक १ यांनी नि.क्र.१४६ प्रमाणे म्हणणे दाखल करून सदर अर्जातील संपूर्ण मजकूर नाकारला आहे. प्रतिवादी क्रमांक १ असे कथन करतात की, नि.क्र.१४१ येथील अर्जातील मजकुर हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६, नियम १७ चे तरतुदीस अनुसरुन नाही. वादी दुरुस्त अर्ज परीच्छेद क्रमांक १ ते ३ मध्ये जी दुरुस्ती करत आहेत, त्यामुळे दावा मिळकतीचे संपूर्ण वर्णन बदलणार असून सदर प्रतिवादीचे कायदेशीर हक्कावर गंडांतर येणार आहे. त्यामुळे अशा प्रकारची दुरुस्ती वादींना कायदयाने करुन मागता येणार नाही. वादी मुळ दाव्यामधील नमूद मिळकती बदलून ज्या मिळकतीचा दावा दाखल केला

नाही, त्या मिळकती दाव्यामध्ये समाविष्ट करुन मुळ दाव्यातील मिळकती कमी करणेची विनंती करत आहेत. त्यामुळे दाव्याचे स्वरुप बदलणार असून मुळ दाव्यात मागितलेली दाद व दुरुस्ती अर्जात वादी जी दाद मागत आहे, ही परस्पर विरोधी आहे.

०४. प्रतिवादी क्रमांक १ ने पुढे असे कथन केले आहे की, वादींनी सदरील दावा हा सन २०१४ साली दाखल केलेला असून त्यानंतर ११ वर्षे दावा प्रलंबित असताना देखील वादींनी कोणतीही दुरुस्ती केलेली नाही. त्यामुळे ११ वर्षांनी दाखल केलेला दुरुस्ती अर्ज हा मुदतबाहय असून त्या दुरुस्तीमुळे प्रतिवादीचे कायदेशीर हक्कावर परीणाम होणार असून न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे दुरुस्ती अर्जात मागणी करतात त्याप्रमाणे वादींना मुळ दाव्यातील कोणताही मजकुर कमी करता येणार नाही व जादा मिळकती सामील करता येणार नाहीत. करीता वादीचा नि.क्र.१४१ चा दुरुस्ती अर्ज फेटाळणेची विनंती केली.

०५. वादी व प्रतिवादी यांच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०६. प्रस्तुत अर्ज व प्रतिवादी यांचे म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादी यांनी अभिलेखावर दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीचे दाव्याचे बारकाईने अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने प्रस्तुतचा दावा वाटपासाठी व विभक्त ताब्यासाठी दाखल केला आहे. अभिलेखावरुन असे दिसून येते की, प्रस्तुत प्रकरणात वाद मुद्दे नि.क्र.१२६ दिनांक ०९.०२.२०२१ रोजी काढणेत आले आहेत. वादीने साक्षीदार क्रमांक १ कालीदास विष्णू बागल यांचे पुराव्याचे शपथपत्र नि.क्र.१२८ हे दिनांक २६.०७.२०२२ रोजी दाखल केले असून प्रतिवादी यांनी वादीचे साक्षीदाराचा उलट तपास घेतलेला नाही. म्हणजेच सदर प्रकरणात वादीचा पुरावा सुरु आहे व प्रतिवादी यांना त्यांचे बाजूचा पुरावा देणेची संधी निश्चित प्राप्त होणार आहे. माझे मते, वादीने प्रस्तुत अर्जाद्वारे मागणी केल्याप्रमाणेची दुरुस्ती मान्य केल्यास दाव्यामध्ये नमूद केलेल्या मिळकतींचे बाबत वाद निर्माण होणार नाही. एकंदरीत अर्जात नमूद केलेल्या वादीच्या प्रस्तावित दुरूस्ती मथळयाचा विचार करता वादी यांनी दावा मिळकतीबाबतची पार्श्वभुमी अभिलेखावर येणेसाठी मागणी केलेली प्रस्तावित दुरूस्ती न्यायाचे दृष्टीने आवश्यक बाब असल्याचे दिसून येते. वादी यांनी प्रस्तुत अर्जान्वये मागणी केलेल्या प्रस्तावित दुरूस्ती मंजूर केल्यास दाव्याचा गुणवत्तेवर निर्णय देणेस मदतच होणार आहे. वादी यांना प्रस्तुत दुरूस्ती करणेस परवानगी दिल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. माझ्या मते, जर प्रस्तुत दुरूस्ती अर्ज मंजूर केला तर दाव्याचे स्वरूपात फार मोठा बदल होईल

अशी बाब दिसून येत नाही. तसेच प्रस्तुत अर्ज मंजूर केल्यानंतर प्रतिवादी यांना ती बाब खोडून काढण्याकरिता यापुढे संधी मिळणार आहे. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करतो.

**आदेश**

१. अर्ज खर्च रक्कम रू.३००/- सह मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी नियमाप्रमाणे मुदतीत १४ दिवसांच्या आत अर्जात मागणी केल्याप्रमाणे दुरूस्ती करावी.

३. वादी यांनी दावा दुरूस्त केल्याबाबतची प्रत मूळ दाव्याचे कामी तसेच प्रतिवादी यांना देणेची आहे.

SALIM PIRMAHAMAD SAYYAD

Digitally signed by SALIM PIRMAHAMAD SAYYAD
Date: 2025.07.05 11:24:29 +0530

दि.०३.०७.२०२५ (एस. पी. सैय्यद)

वडूज. २रे सह–दिवाणी न्यायाधीश व. स्तर.वडूज.